14 JUL 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रांतीचे पोवाडे देशाला दिशा देणारे

## -शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शाहीर लहरी हैदर, शाहिर विशारद पिराजीराव सरनाईक, शाहीर विठ्ठल उमाप, शाहीर कुंतीनाथ करके वामनराव करडक आदींनी आपल्या शाहीरीतून समाजाचे प्रबोधन केले, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

शाहीर, कवी, लेखक, नाट्यकलाकार दिनकरराव कांबळे लिखित क्रांतीकारक व समाजसुधारक यांच्या जीवनावर आधारीत 'क्रांतीचे पोवाडे" या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. राज्य शाहीर परिषद कोल्हापूर शाखेचे अध्यक्ष शामराव खडके यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन करण्यात आले.

डॉ. शिंदे म्हणाले, कथा एका जवानाची, गोष्ट शालीच्या लग्नाची, फकिरा, गुणवंताची मुलगी, देवता, डोंगराचा राजा आदी पुस्तकांचे लिखाण केले आहे. अध्यक्ष शामराव खडके म्हणाले, आम्हा तमाम महाराष्ट्रातील शाहीर आणि शाहीर दिनकर कांबळे यांचे पोवाडे सादर करण्यासाठी एक मोक्याची संधी मिळाली. पोवाड्याच्या माध्यमातून समाजप्रबोधन करण्याची जबाबदारी शाहीरांची आहे. ग्रामीण भागातील संघर्षमय शाहीरांचा पुस्तकरूपी पोवाडा शालेय विद्यार्थ्यांना वेगळा विचार देईल. डॉ. सयाजीराव गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. शाहीर बाबुराव कांबळे, प्रा. विष्णू कांबळे, एस. एस. कांबळे, लहू वाहकर, बाबुराव बेलवळेकर, के. वाय. कर्णीक, वसंतराव देसाई, फुले, शाहू विचार मंचाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यातील ५४ शेतकरी रेशीमशास्त्राचे परीक्षार्थी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागात रेशीमशास्त्र पदव्युत्तर पदविका आणि पदविका या अभ्यासक्रमांच्या परीक्षांना मंगळवारी प्रारंभ झाला. या ऑफलाइन परीक्षेसाठी राज्यभरातील ५४ शेतकरी विभागात उपस्थित राहिले आहेत.

या अभ्यासक्रमासाठी यंदा सिंधुदुर्गपासून ते चंद्रपूरपर्यंतचे शेतकरी प्रवेशित झाले आहेत. शास्त्रीय ज्ञान मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचा रेशीम शेतीतील आत्मविश्वास वाढतो आणि त्यांच्या एकूण उत्पादनात आणि अर्थशास्त्रात मोठा बदल होतो. पदविका अभ्यासक्रमासाठी सहावी उत्तीर्ण आणि रेशीम शेतीतील तीन वर्षांचा अनुभव, अशी पात्रता असल्यास संबंधितांना प्राधान्याने प्रवेश दिला जातो, असे या सेंटरचे समन्वयक यांनी सांगितले.

> सर्व शेतकरी विद्यार्थी मोठ्या उत्साह, आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जात आहेत, ते भरपावसातही इथे हजर झाले, हीच या अभ्यासक्रमाच्या यशाची पोचपावती आहे.
>
> **- डॉ. ए. डी. जाधव, समन्वयक**